गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १७८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

### जालना महानगरपालिकेची ६ मार्च रोजी विशेष सभा

## स्वीकृत सदस्यांच्या निवडीसह विविध समित्याच्या स्थापनेवर होणार शिक्कामोर्तब

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेची विशेष सभा शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:00 वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील नवीन सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे यांच्या मान्यतेने नगरसचिव सुप्रिया चव्हाण यांनी या सभेची सूचना निर्गमित केली आहे.

या विशेष सभेत शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेतले जाणार आहेत

स्वीकृत सदस्य निवड: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि नियम २०१२ नुसार, नवनियुक्त पालिका सदस्यांव्यतिरिक्त ६ (सहा) नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांचे नामनिर्देशन करणे.

स्थायी समिती सदस्य नियुक्ती: अधिनियमातील कलम ३१ अ नुसार प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाद्वारे स्थायी समितीमधील १६ सदस्यांची नियुक्ती करणे.

विशेष व प्रभाग समित्यांची स्थापना: महिला व बाल कल्याण समितीसह इतर आवश्यक विशेष समित्या आणि प्रभाग समित्यांची स्थापना करणे.

इतिवृत्त कायम करणे: दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**नामनिर्देशित सदस्यांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर**

६ स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी नगरसचिव कार्यालयाकडून स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे:

१ नामनिर्देशन पत्र वितरण २६ व २७ फेब्रुवारी २०२६ (सकाळी १० ते सायं. ५) नगर सचिव कार्यालय

२ नामनिर्देशन पत्र स्वीकारणे २ मार्च २०२६ (सकाळी १० ते सायं. ५) नगर सचिव कार्यालय

३ अर्जांची छाननी ४ मार्च २०२६ (दुपारी १२:00 पासून) छाननी आयुक्त जालना शहर महानगरपालिका या करणार आहेत. या सभेमुळे जालना महानगरपालिकेच्या कारभाराला खऱ्या अर्थाने गती मिळणार आहे.

## कामाची अजब तऱ्हा

### सहयोग नगर वार्ड बारा मध्ये दोन्ही रस्ते एकाच वेळी खोदून ठेवले

नागरिकांना नाहक त्रास



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील सहयोग नगर वार्ड नंबर १२ मध्ये गेल्या महिनाभरापासून नाली बांधकामा साठी एकाच वेळी दोन्ही रस्ते खोदून ठेवले आहे.यांना उशिरा बांधकाम करायचे होते तर यांनी एकच रस्ता खोदून ठेवायचा होता परंतु यांनी एकाचवेळी दोन्ही रस्ते खोदून वाहतूक बंद झाली असून हे काम नेमके कधी होणार अद्याप समजू शकत नाही.परंतू यामुळे वार्डातील नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.मोटार सायकल,कार, शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना ऑटो रिक्षे लावलेले आहेत त्यांना रोडवर उभे करून मुलांना आणण्यासाठी घरी पाई पाई जावे लागत आहे.आनखीन यापेक्षा मोठी समस्या ती म्हणजे याच वार्डात चेंबर लीकीज झाले आहेत यामधून घान पाणी घरासमोर जमा झाले यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे नगर पालिकेला वारंवार सूचना देऊनही कारवाई होत नाही जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे का?किती दिवस त्रास सहन करावा लागतो हा प्रश्न नागरिकांना पडला आहे.नागरीकां मध्ये संतापाची लाट उसळली आहे. तरी नगर पालीकेने नाली व त्यावर ढापा टाकून लवकरात लवकर पूर्ण करून द्यावे अशी मागणी वार्डातील नागरिकांनी केली आहे.येनाऱ्या दोन तीन दिवसांत ह्या रस्त्याचे व चेंबरचे काम सुरू नाही केले तर सर्व वार्डातील नागरिक नगरपालिके समोर उपोषण करण्यात येईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी, दिपक इंगोले.यांनी या संदर्भात जाणीवपूर्वक लक्ष देऊन रस्त्याचे काम लवकर चालू करण्याचे आदेश देण्यात यावेत अशी मागणी होत आहे.

## अंबड तालुक्यातील पारनेर परीक्षा केंद्रास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची भेट

**जालना । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील आदर्श स्कूल पारनेर येथील परीक्षा केंद्रास जिल्हाधिकारी यांनी आज अचानक भेट देऊन सुरू असलेल्या इयत्ता बारावीच्या परिक्षेची पाहणी केली. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, शिस्त आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा कक्षांची पाहणी करून विद्यार्थ्यांच्या आसनव्यवस्थेची, प्रश्नपत्रिका वितरणाची तसेच देखरेख व्यवस्थेची माहिती घेतली. तसेच विद्यार्थांना उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या सोयीसुविधांची पाहणी केली. केंद्रप्रमुख व पर्यवेक्षकांशी संवाद साधून परीक्षा सुरळीत व नियमानुसार पार पाडण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या.

परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.यावेळी संस्थाचालक अशोक लांडे,केंद्र संचालक श्री गाढे व पर्यवेक्षीय यंत्रणेतील कर्मचारी उपस्थित होते.






जालना शहर महानगरपालिका यांच्या वतीने मोकाट कुत्रे निर्बीजीकरण मोहीम राबविण्यात आली यावेळी कुत्रे पकडून टाकताना. (छायाचित्र किरण खानापुरे)

## जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थांना न्याय्य वाटा द्या - महेंद्र रत्नपारखे

### १० लाखांपर्यंतची कामे एकत्र न करता कामवाटप समितीकडे पाठविण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील मजूर कामगार सहकारी संस्थांना नियमानुसार कामांचा वाटा मिळावा यासाठी १० लाख रुपयांपर्यंतची कामे एकत्रिकरण न करता थेट कामवाटप समितीकडे पाठविण्याची मागणी पुढे आली आहे. या संदर्भात जालना जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था संघ मर्या. चे अध्यक्ष महेंद्र रत्नपारखे यांनी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे.



सदर पत्रानुसार, जिल्ह्यात एकूण ३०४ ते ३०५ मजूर सहकारी संस्था या संघाच्या सभासद आहेत. दरवर्षी प्रत्येक संस्थेला ठराविक प्रमाणात कामे उपलब्ध व्हावीत, यासाठी कामवाटप समितीकडे प्रस्ताव पाठविणे अपेक्षित आहे. मात्र, विविध विभागांकडून निघणारी लहान-मोठी कामे एकत्रित करून मोठ्या कामांमध्ये रूपांतरित केली जात असल्याने ३३:३३:३४ या प्रमाणात कामांचे वाटप होत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

कामांचे एकत्रिकरण झाल्यामुळे अनेक लहान मजूर सहकारी संस्थांना थेट कामे मिळत नसून त्या कामापासून वंचित राहत आहेत. परिणामी, संस्थांच्या आर्थिक व्यवहारावर परिणाम होत असून कामगारांनाही रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याचे नमूद पान २ वर

## कुष्ठरुग्णांसाठी विकृती पडताळणी व पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया शिबिर संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत आज जालन्यात विकृती पडताळणी व पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियापूर्व शिबिर उत्साहात पार पडले. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद व कुष्ठरोग कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सामान्य रुग्णालय परिसरातील कुष्ठरोग कार्यालयात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराची वैशिष्ट्ये:

रुग्ण सहभाग: जालना शहर व ग्रामीण भागातील एकूण ४० कुष्ठरुग्णांची या शिबिरात उपस्थिती होती.

तपासणी: हाताची विकृती, वाकडी बोटे, मनगट लुल पडणे, डोळ्यांच्या व पायांच्या समस्या, पायांचे अल्सर आणि बसके नाक अशा विविध विकृतींची तज्ज्ञांमार्फत सखोल तपासणी करण्यात आली.

साहित्य वाटप: रुग्णांना दैनंदिन जीवनात मदत व्हावी यासाठी एमसीआर चप्पल, गॉगल, अल्सर किट यांसारख्या भौतिक उपचाराच्या साधनांचे वाटप करण्यात आले.

शिबिरादरम्यान डॉ. सुधाकर शेळके (सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा - कुष्ठरोग) यांनी रुग्णांना मार्गदर्शन केले. यावेळी रुग्णांना भौतिकोपचाराचे (फिजिओथेरपी) प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले आणि त्यांना नियमित व्यायाम करण्याचा पान २ वर

## ‘आपलं गाव आपली जबाबदारी’

### प्रशासन-युवकांच्या एकजुटीतून दैठणा खुर्दचा रस्ता झाला सुरक्षित; लोकसहभागाचा आदर्श नमुना

**परतुर । प्रतिनिधी -** ‘‘आपलं गावआपली जबाबदारी’’ हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता प्रत्यक्ष कृतीतून साकार झाल्याचे प्रेरणादायी उदाहरण दैठणा खुर्द येथे पाहायला मिळाले. परतुर तालुक्यातील या गावात प्रशासकीय अधिकारी आणि नवतरुणांच्या संयुक्त प्रयत्नातून मुख्य रस्त्यावरील धोकादायक खड्डे बुजविण्यात आले असून ग्रामविकासात लोकसहभाग किती प्रभावी ठरू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे.

गावातील मुख्य रस्ता हा वाहतुकीचा महत्त्वाचा मार्ग असून ट्रॅक्टर व हायवा वाहनांची सततची ये-जा यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. त्यामुळे शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दुचाकीस्वारांना रोजच्या प्रवासात मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असल्याने अपघाताचा धोका वाढला होता. ग्रामस्थांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन गावातील जबाबदार अधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. तलाठी अंकुश चव्हाण, गणेश कदम, महसूल सहाय्यक अधिकारी मयूर सवणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोल्हापूर येथील प्रा. भरत कदम, पुणे येथे कार्यरत सहशिक्षक दिनेश ताठे तसेच ज्ञानेश्वर बाबर, प्रद्युम्न सवणे, संदीप काटकर आणि गावातील नवयुवकांनी एकत्र येत समाजहिताचा उपक्रम हाती घेतला.



**स्वखर्चातून विकास सामाजिक बांधिलकीची जाणीव**

शासकीय निधीची प्रतीक्षा न करता संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतःच्या स्वखर्चातून सिमेंट काँक्रीटद्वारे रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले.

नियोजनपूर्वक, तांत्रिक पद्धतीने आणि टिकाऊ दर्जा राखत काम पूर्ण करण्यात आले. ही कृती केवळ दुरुस्ती नव्हती, तर नागरिकांप्रती असलेल्या जबाबदारीची ठोस अभिव्यक्ती होती.

या उपक्रमाने ग्रामविकासाचा एक महत्त्वाचा सिद्धांत अधोरेखित केला विकास केवळ शासनावर अवलंबून नसतो; तो लोकांच्या सहभागातून अधिक वेगाने आणि परिणामकारकपणे घडू शकतो.

रस्ता सुरक्षित व सुरळीत झाल्याने अपघाताचा धोका कमी, विद्यार्थ्यांचा प्रवास सुलभ, ग्रामस्थांचा प्रशासनावर विश्वास अधिक दृढ, सामुदायिक जबाबदारीची भावना बळकट, स्वयंस्फूर्त विकासाचे प्रेरणादायी मॉडेल तयार, प्रशासनाची लोकाभिमुख प्रतिमा मजबूत.

या उपक्रमातून प्रशासनाची लोकाभिमुखता स्पष्टपणे दिसून आली. ‘‘सरकारी काम म्हणजे विलंब’’ ही धारणा मोडीत काढत, स्थानिक पातळीवर तातडीचे निर्णय घेऊन प्रत्यक्ष कृती कशी करता येते, हे दाखवून देण्यात आले.

**इतर गावांसाठी प्रेरणादायी आदर्श**

‘‘आपलं गावआपली जबाबदारी’’ ही संकल्पना प्रत्यक्षात उतरल्यास ग्रामीण विकासाची गती किती वाढू शकते, याचे हे उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे. ग्रामस्थ, प्रशासन आणि युवक एकत्र आले तर समस्या मोठी असली तरी उपाय शक्य असतो हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे समोर आला आहे.

दैठणा खुर्द येथे राबविण्यात आलेली ही लोकसहभागातून झालेली रस्ता दुरुस्ती ही केवळ स्थानिक सुविधा सुधारणा नसून ग्रामीण विकासाच्या नव्या विचारांची सुरुवात आहे. समाजाप्रती असलेली जबाबदारी कृतीतून पार पाडल्यास परिवर्तन शक्य होते, याचा हा प्रेरणादायी आणि अनुकरणीय आदर्श आहे.

संपादकीय पान

# गझल सम्राट

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा आज दुसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## वाचकांचे मनोगत

# उरण येथील दुर्घटनांना जबाबदार कोण ?

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील ओ एन जी सी कंपनी केंद्र सरकारचा उपक्रम आहे. कंपनी तेल आणि गॅस शी निगडीत आहे.त्यामुळे येथील संपूर्ण अद्ययावत उपकरणे, तंत्रज्ञान,संशोधन याने विकसित आहे.खराब तेलाचा व गॅस निचरा भूमीगत पाइपलाइन मधुन खूप दूरवर जाऊन होतो.असे असताना या परिसरात आगी लागणे, वायुगळती सारख्या दुर्घटना घडतात याला नेमके काय कारण आहे ते शोधून काढले पाहिजे.खर तर अशा महत्त्वाच्या कंपन्यांच्या जवळपास लोकवस्ती निर्माण होणे धोक्याची घंटा आहे.संवेदनशील कंपनीच्या किंवा उपक्रमांच्या जवळपास लोकवस्ती असू नये ते याच साठी की कधी दुर्दैवी घटना घडली तर जीवीत हानी होऊ नये.काही वेळा भूर्टे लोक पाइपलाइन मधुन वाहून जाणाऱ्या तेल व गॅस मधुन हाताला काही लागेल का अशा भावनेने शोधत असतात.२० फेब्रुवारी २०२६ रोजी आग लागली होती तेव्हा तेथील लोकांनी पळ काढला म्हणून जीवीत हानी झाली नाही.काही वेळा तापमान अति वाढ झाली तर आगीच्या दुर्घटना घडतात.ज्वलनशील पदार्थांची विक्री अशा परिसरात करण्यास प्रतिबंध असावा.धुम्रपान करण्यास प्रतिबंध असावा.कंपनी मधील कामगार - अधिकारी यांनी आपल्या हातून नकळत चुकीचे काम होणार नाही याची काळजी घ्यावी.जेणे करुन आजुबाजुला असलेल्या गावांना आगीची झळ बसणार नाही.संपुर्ण परिसरात सी सी टी व्ही कॅमेरा व ड्रोनच्या सहाय्याने पाळत ठेवावी.अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन व्यवस्थापन सेवा तत्पर असावी.म्हणजे दुर्घटनेनंतर परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवता येईल.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# स्वातंत्र्यवीर सावरकर महान देशभक्त

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ साली नाशिक जिल्ह्यातील भागुर येथे झाला. सावरकरांच्या मनात जन्मापासूनच देशभक्तीची भावना ज्वालामुखी सारखी धकधकत होती आणि जसे-जसे सावरकर मोठे होत गेले तसतशी स्वातंत्र्यासाठी मशाल प्रज्वलित होत होती.वीर सावरकरांनी लाला लजपतराय,बाळ गंगाधर टिळक व विपिन चंद्र पाल या महान क्रांतिकारक महापुरुषांपासुन प्रेरणा घेऊन आपली वाटचाल सुरू केली आणि क्रांतीचा लढा सुरू ठेवला व कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता भारताला स्वतंत्र मिळावे यासाठी स्वतंत्र लढ्याच्या कुंडात उडी घेतली.१८५७ च्या गनिमी संघर्षाच्या विद्रोहाचा अभ्यास केला.त्यावर आधारित एक पुस्तक लिहिले'' द हिस्ट्री ऑफ व वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स'' नावाच्या या पूस्तकाने इंग्रज प्रशासनाचे धाबे दणाणले. त्यामुळे हे पुस्तक इंग्रजांनी बेकायदेशीर ठरविले.परंतु सावरकरांच्या गनिमी काव्याने बिहारमध्ये हे पुस्तक लोकप्रिय झाले आणि स्वातंत्र्याची ज्वाला धकधकायला लागली.सावरकर आणि त्याचा भाऊ गणेश यांनी भारतीय परिषद कायदा १९०९ च्या विरोधात निदर्शने केली.यावर इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरविले व अटक वॉरंट जारी केला अटक होवू नये म्हणून सावरकर पॅरिसला गेले.नंतर १९१० मध्ये सावरकरांना इंग्रजांनी पकडले व न्यायालयाने त्यांना दोषी ठरवुन ५० वर्षाची शिक्षा ठोठावली. ४ जुलै १९११ ला काळ्या पाण्याची शिक्षा जाहीर झाली व अंदमान आणि निकोबार येथील सेल्युलर जेलमध्ये टाकण्यात आले.तेथे त्यांच्यावर व त्यांच्या सहकाऱ्यांवर इंग्रजांकडुन सतत अत्याचार होत होते. परंतु त्यांनी स्वातंत्र्य लढ्याचा धीर सोडला नाही आणि अनेक यातना सहन करीत इंग्रजांना बजाऊन सांगितले की,मी जिवंत आहे तोपर्यंत देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसेल व आपल्याला भारत सोडून जावे लागेल आणि हे सावरकरांनी सिद्ध करून दाखविले ही महानता सावरकरांमध्ये दिसून येते.सध्याच्या परिस्थितीत देशातील काही राजकीय पुढारी महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह, विद्वेषक व चिथावणी देणारे विधान करतांना दिसतात.ही बाब अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे. देशाच्या इतिहासात सावरकरांना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असे संबोधले जाते.म्हणजेच स्वातंत्र्यवीर ही पदवी पारतंत्र्यातील देशभक्तांनीच दिली ही बाब आक्षेपार्हय विधान करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. स्वातंत्रपुर्वकाळ अत्यंत खडतर आणि कठीण होता हे सर्वांनाच ठाऊक आहे. त्याकाळी स्वातंत्रवीर सावरकरांच संपूर्ण कुटुंब स्वतंत्र लढ्यात सहभागी होते.महाराष्ट्रात अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष, साधु-संत, समाजसुधारक,जहालवादी-मवाळवादी होवून गेले त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रत्येक तळागाळातील व्यक्तींनी आपले वेगवेगळ्या पध्दतीने योगदान दिले आहे.तेव्हाच भारत स्वतंत्र झाला.इंग्रजांनी भारतावर १५० वर्षे राज्य केले.परंतु देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हसत-हसत फासावर चढले व बलिदान दिले ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.सावरकरांचा काळ कसा होता किंवा त्यांनी स्वातंत्र्य लढा कसा उभारला ही बाब त्याकाळातील सहकाऱ्यांना व देशभक्तांनाच ग्यात असावी. परंतु आता सावरकरांच्या कर्तृत्ववावर कोणी राजकीय पुढारी चीखलफेक करीत असेल व आक्षेपार्ह विधान करीत असेल हे योग्य नाही असे मला वाटते.स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना झालेली काळ्यापाण्याची सजा आणि त्यांनी भोगलेल्या यातना यांचा इतिहास संपूर्ण शालेय पुस्तकांमध्ये लिखित आहे आणि हि शालेय पुस्तके आजची नसुन ७८ वर्षे जुनी आहे.या संपूर्ण पुस्तकांमध्ये अनेक विचारवंतांनी, थोरपुरूशांनी सावरकरांच्या कामाची प्रशंसा सुध्दा केली आहे. तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व स्वातंत्रवीर सावरकर नावाने संबोधले जावु लागले. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की स्वातंत्र्यवीर ही पदवी कोणालाही सहज मिळत नाही त्यासाठी त्याग करावा लागतो आणि सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला तेव्हाच त्यांना स्वातंत्र्यवीर ही पदवी मिळाली व भारत स्वतंत्र झाला ही बाब त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्याकाळी अनेक उतार चढाव होते यात दुमत नाही.परंतु परिस्थिती नुसार प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या पध्दतीने निर्णय घ्यायचे. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक सुद्धा होते.यात जहालवादी, मवाळवादी, क्रांतिकारक अशा अनेक विचारधारांचे लोक होते.त्यामुळे आपसात मतभेद अवश्य असायचे परंतु मतभिन्नता नव्हती.त्यामुळे सर्वांचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त करून स्वतंत्र करने त्यापध्दतीने सर्वांनी आपापल्या परीने योगदान दिले व भारत १९४७ ला स्वातंत्र्य झाला.यात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे मोठे योगदान होते. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला व त्याचा मृत्यू २६फेब्रुवारी १९६६ ला झाला.आज त्यांचा मृत्यू होऊन ६० वर्षे झालीत आणि भारत स्वतंत्र होऊन ७९ वर्षे झालीत मग आताच राजकीय पुढाऱ्यांना कसे काय आठवले की सावरकरांनी इंग्रजांना मदत केली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा इतिहास महाराष्ट्रातील जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना, पक्ष-विपक्षांना चांगल्या प्रकारे ग्यात आहे. त्यामुळे बाहेरच्या राजकीय पुढाऱ्यांनी महाराष्ट्रातील जनतेला स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल जास्त ग्यान देवु नये. कारण स्व.इंदिरा गांधीसह अनेकांनी सावरकरांचा उल्लेख स्वातंत्र्यवीर सावरकर असा अनेकदा केला आहे ही बाब सावरकरांचा विरोध करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.थोरमहात्मे, क्रांतिकारक, स्वातंतासेनानी किंवा आपले पुर्वज ज्यांच्या कर्तृत्ववामुळे आपण खुला स्वास घेत आहे अशांबद्दल अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधान निघणार नाही याची काळजी सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी घ्यावी. सरकारला मी आग्रह करेल की स्वातंत्रवीर सावरकर यांच्या बद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल यानंतर कोणीही आक्षेपार्ह विधान केले तर त्यावर कठोर कारवाई करावी.सध्या देशात विद्वेषी वक्तव्य देण्याचे प्रकार वाढले आहेत.यामुळे सुप्रीम कोर्टाने दिनांक २८ एप्रिल २०२३ रोज शुक्रवारला सुप्रीम कोर्टाने आदेश काढला की विद्वेषी वक्तव्ये करणारे यांची कोणी तक्रार करेल याची वाट न पाहता राज्यांनी कारवाई करावी. त्या कृतीस विलंब झाला तर तो कोर्टाचा अवमान समजला जाईल असे सुप्रीम कोर्टाने आपल्या आदेशात बजावले आहे.त्यामुळे विद्वेषी वक्तव्ये करणाऱ्यांनी आपल्या जिभेवर आवर घालावा. जोपर्यंत सुर्य -चंद्र-तारे-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत सावरकरांचे व संपूर्ण देशभक्तांचे नाव देशात स्वाभिमानाने घेतले जाईल.सावरकरांची पुण्यतिथी साजरी करीत असतांना देशवासीयांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की आज बदलत्या हवामानामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.परंतु आपण यावर मात करू शकतो स्वातंत्रवीर सावरकरांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रासह संपूर्ण देशवासीयांना आग्रहाची विनंती करतो की आजच्या दिवशी प्रत्येक देशभक्तांनी वृक्षलागवडीचा संकल्प करावा व शाळा , महाविद्यालय, शासकीय विभाग, संस्था या सर्वांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना श्रद्धांजली अर्पण करावी.यामुळे आपल्याला झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात सावरकरांचे दर्शन अवश्य होईल.स्वातंत्रवीर सावरकर यांना पुण्यतिथी निमित्त माझा कोटी कोटी प्रणाम!जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो. नं.९९२१६९०७७९ नागपूर.**

# क्रांतीसूर्य स्वातंत्र्यवीर सावरकर


स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर (जन्म २८ मे १८८३) या द्रष्ट्या, क्रांतीकारी देशभक्त अन् अत्यंत प्रतिभासंपन्न व्यक्तीमत्त्वाचे नाव भारताच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने कोरले गेले आहे ! आजच्या अत्यंत व्यक्तिकेंद्रीत, संकुचित, 'अर्थ आणि काम' यांभोवती गुंजी घालणाऱ्या आणि जातीयवादी साहित्याच्या तुलनेत उत्तुंग, उज्ज्वल अन् महन्मंङ्गल असे जगण्याचे एक उदात्त ध्येय समोर ठेवणाऱ्या अविस्मरणीय अशा साहित्याची निर्मिती भाषाप्रभू आणि विद्वतप्रचूर सावरकरांनी केली. 'राष्ट्र' हेच त्यांचे जीवनमूल्य असल्याने त्यांचे एकमेवाद्वितीय साहित्य हे राष्ट्रहिताच्या अनुषंगानेच प्रसवलेले आहे. साहित्यिकही अनेक असतात आणि क्रांतीकारकही अनेक होऊन गेले; मात्र स्वातंत्र्यवीर सावरकारांसारखा क्रांतीवीर साहित्यिक हा यासम हाच !'

अंदमानाच्या कारावासात पाठवण्याच्या आधी कारागृहातील शेवटच्या भेटीत स्वा.सावरकरांनी आपल्या तरुण पत्नीला केलेला उपदेश !

''....बरें ईश्वराची दया असेल, तर पुनः भेट होईलच. तोवर जर कधी या सामान्य संसाराचा मोह होऊ लागला, तर असा विचार करा की, मुला-मुलींची वीण वाढविणे व चार काटक्या एकत्र करून घरटी बांधणे यालाच जर संसार म्हणावयाचे असेल, तर असले संसार कावळे-चिमण्याही करीतच आहेत; पण संसाराचा याहून भव्यतर अर्थ जर घेणे असेल, तर मनुष्यासारखा संसार थाटण्यात आपणही कृतकार्य झालो आहोत. आपली चार चूल-बोळकी आपण फोडून टाकली; पण त्यायोगे पुढेमागे हजारोजणांच्या घरी धूर निघेल आणि घर घर म्हणून करीत असतांनाही प्लेगने नाही का शेकडो जणांची घरे ओसाड पाडली, लग्नाच्या मंडपातून नवरा-नवरीस विलग हिसडून मृत्यूच्या दाढेत ढकलून दैवाने जोडपी विजोड करून टाकली ! असा विवेक करून संकटास तोंड द्या.'' - स्वा. सावरकर

देशभक्तांचे रक्त सळसळविणारी स्वा. सावरकरांची लेखणी !

'लंडनमध्ये एकदा गुप्तचरांनी स्वा. सावरकरांना अडवले आणि म्हटले, ''महाशय, क्षमा करा. आम्हाला तुमच्याविषयी संशय आहे. तुमच्यापाशी घातक हत्यार आहे, अशी निश्चित वार्ता असल्याने तुमची झडती घ्यायची आहे !'' सावरकर थांबले, गुप्तचरांनी झडती घेतली. काहीच सापडले नाही ! तेव्हा गुप्तचरांचा प्रमुख अधिकारी सावरकरांना म्हणाला, ''क्षमा करा. चुकीच्या बातमीमुळे तुम्हाला त्रास झाला.'' सावरकर म्हणाले, ''तुम्हाला मिळालेली वार्ता चुकीची नाही. माझ्यापाशी भयंकर घातक हत्यार आहे.'' खिशातील झरणी (पेन) दाखवून सावरकर म्हणाले, ''हे पहा, ते हत्यार ! यातून निघणारा एकेक शब्द तरुणांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतो. या शब्दांनी देशभक्तांचे रक्त सळसळते आणि ते राष्ट्रासाठी तळहातावर शिर घेऊन लढण्यास सिद्ध होतात !''




राष्ट्राचे संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य चिंता असली पाहिजे !

१९३८ साली मुंबईत झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून साहित्यिक सावरकरांनी हिंदूंना एक संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात स्वा. सावरकर म्हणाले, ''आता सरते शेवटी मला हे सांगितल्यावाचून गत्यंतरच दिसत नाही. 'साहित्य हे आजच्या आपल्या राष्ट्राच्या परिस्थितीत दुय्यम-तिय्यम कर्तव्य आहे. साहित्यिक सज्जनहो, सूज्ञहो, साहित्यासाठी जीवन आहे कि जीवनासाठी साहित्य ? आपले साहित्य हे राष्ट्रीय जीवनाचे एक उपांगच काय ते असेल, तर राष्ट्रीय जीवनाचे संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य चिंता, मुख्य साध्य असले पाहिजे. अगदी कलेसाठी कलेचा जो उपासक त्याच्याविषयीही मला आदरच वाटेल; पण असे उपासक त्या कलानंदात एखाद्या नाट्यगृहामध्ये रंगून गेले असता, जर त्या नाट्यगृहालाच आग लागली, तर कलेसाठी कलेला झिडकारून ते प्रथम जीव वाचवण्याच्या मार्गास लागतील. त्याचप्रमाणे राष्ट्राच्या प्राणावरच बेतले असता केवळ साहित्याची काय कथा ?'

स्वातंत्र्य संपादनाचे श्रेय देवाला केलेल्या अबोल प्रार्थनेलाही ! भारत स्वतंत्र करण्याचे श्रेय हे सशस्त्र किंवा निःशस्त्र अशा कोणत्याही पक्षाचे नसून ते गेल्या दोन पिढ्यांतील सर्व पक्षांच्या सर्व स्वदेशनिष्ठांचे सामायिक श्रेय आहे. मी तर त्याच्याही पुढे जाऊन स्वानुभवाने असे सांगतो की, सशस्त्र वा निःशस्त्र अशा कोणत्याही गुप्त वा प्रकट चळवळीत ज्यांनी सक्रिय भाग घेतला नाही; परंतु ज्यांनी ज्यांनी आपापल्या हृदयात एक सहानुभूती बाळगली आणि 'देवा, माझ्या भारताला स्वतंत्र कर' म्हणून अबोल प्रार्थना केल्या, त्या आमच्या लक्षावधी स्वदेशबांधवांनाही या राष्ट्रीय विजयाचे श्रेय त्या त्या प्रमाणात आहेच आहे. - स्वा. सावरकर, १९५२

कोणी हल्ला केलाच , तर मारत , मारत मरणे मला आवडेल', असे वृद्धावस्थेतही म्हणणारे स्वा. सावरकर !

श्री. पु. गोखले यांनी वृद्धावस्थेतील स्वा.सावरकरांना एकदा विचारले, ''तात्या तुमचे वय आणि ही क्षीण प्रकृती पहाता, आपण जो जांबिया जवळ ठेवता त्याचा कितपत उपयोग करू शकाल ?'' यावर सावरकर उत्तरले, ''मी थकलो आहे, माझे वयही होत आले आहे, हे सगळे खरे. इथे कोणी माझ्यावर हल्ला करेल, असा संभवही जवळजवळ नाहीच; पण हे सर्व आपण काही गृहीत कृत्ये धरून काढलेले निष्कर्ष आहेत. आपला निष्कर्ष बरोबर येत राहिला आणि आपण शस्त्रधारी राहिलो, तरी काही नुकसान होणार नाही; पण आपला तर्क चुकला तर ? स्वामी श्रद्धानंदांचा तर्क असाच चुकला होता. अब्दुल रशीदने या हिंदूंचा अंदाज चुकणार, हा अंदाज बरोबर केला होता. समज, उद्या माझ्यावर कोणी हल्ला केलाच, तर माझी प्रतिकारशक्ती कमी पडेलही. प्रतिकार कमी पडला नि मला पराभव पत्करावा लागला, तर कधीच वाईट वाटणार नाही; पण प्रतिकार न करता मी पतन पावलो, तर मला अतोनात दुःख होईल. 'झुंजत रहाणे' हे मी आयुष्यभर केलेले आहे. कोणी हल्ला केलाच, तर मारत, मारत मरणे मला आवडेल. शस्त्र वापरण्याची वेळ आयुष्यात सहसा येत नाही; पण कधीही न येईल अशी वाटणारी वेळ आलीच, तर नुसता पश्चाताप करून कार्यभाग साधत नाही. पुष्कळ वेळा नुसते शस्त्र जवळ आहे, यानेच काम भागते.''

साहित्य : स्वातंत्र्यवीर सावरकरांनी विपुल लिखाण केले. त्यामध्ये अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर, हिंदुपदपातशी, सहा सोनेरी पाने, शिखांचा इतिहास (अप्रकाशित) या व्यतिरिक्त विविध नाटके, कादंबरी इत्यादी आहेत.

असे थोर क्रांतिकारक, दूरदृष्टीचे नेते, लेखक, नाटककार आणि कवि स्वातंत्र्यवीर सावरकरांनी प्रयोपवेशन करून २६ फेब्रुवारी १९६६ रोजी मुंबई येथे देह सोडला. स्वा.सावरकर यांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम !

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती,**
**संपर्क क्र.: ८२०८४४३४०१**

# दिल्लीतील दोन्ही सभागृहांमध्ये अजित दादांच्या अपघाताबद्दल आवाज उठवला जाणार



**मुंबई -** स्व. अजितदादांच्या विमान अपघाताबाबत अनेक शंका असून या अपघाताचा कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय निष्पक्ष तपास होणं आवश्यक आहे पण तसं होताना दिसत नाही...

याबाबत लोकसभेत खा. सुप्रियाताई आणि खा. डॉ. अमोल कोल्हे या विषयावर आवाज उठवतील आणि राज्यसभेत आवाज उठवण्याची विनंती ज्येष्ठ नेते आणि शिवसेना खा. संजय राऊत साहेब यांना आमदार रोहित पवार यांनी केली आणि त्याबाबतचं सविस्तर पत्रही त्यांना यावेळी पवार यांनी दिलं.

दोघांमध्ये यावेळी अपघाताशी संबंधित अनेक विषयांवर सविस्तर चर्चाही झाली असल्याचं फेसबुक पोस्ट वर आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

पान १ वरुन

## जिल्ह्यातील मजुर ...

करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर १० लाख रुपयांपर्यंतची कामे एकत्र न करता ती स्वतंत्र स्वरूपातच अध्यक्ष, कामवाटप समिती तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांचेकडे ३३:३३:३४ या प्रमाणात पाठविण्यात यावीत, अशी विनंती करण्यात आली आहे.

सदर बाबीचा संदर्भ व्यवस्थापक, जालना जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थांचा संघ मर्या. जालना यांच्या पत्र क्र. २३५ दिनांक १३ जानेवारी २०२६ यास असून त्याची प्रत संबंधित कार्यालयास सादर करण्यात आली आहे. याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनीही संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

जिल्ह्यातील शेकडो मजूर सहकारी संस्थांच्या अस्तित्वाचा आणि कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न या निर्णयाशी निगडित असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी संघटनेकडून करण्यात येत आहे.

## कुष्ठ रुग्णांसाठी ...

सल्ला देण्यात आला.

''सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसार हे ध्येय साध्य करण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे आहे,'' असे प्रतिपादन डॉ. शेळके यांनी यावेळी केले.

या प्रसंगी जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी श्री. बोराडे, डॉ. रोहित ठोंबरे, कुष्ठरोग पर्यवेक्षक श्री. एन. जे. मगर, श्री. देवकाते, श्री. ढाके यांच्यासह कार्यालयातील कर्मचारी व आरोग्य विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# राज्य शासनाने सेवली येथे अतिरिक्त तहसील कार्यालयास मंजुरी न दिल्यास वंचितचे आक्रमक आंदोलन



**जालना । प्रतिनिधी -** तहसील व महसूलची शासकीय कामे करण्यासाठी जालना ते सेवली ६५ कि.मी. पेक्षा जास्त अंतर आहे म्हणून सेवली व परीसरातील नागरिकांची रोज होत असलेली गैरसोय होऊ नये म्हणून सेवली येथे शासनाने अतिरिक्त तहसील कार्यालयची मंजुरी द्यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यशासनाला निवेदनाद्वारे करण्यात आली आहे सदरील मागणी मान्य न झाल्यास दिनांक १० मार्च २०२६ रोजी सेवली येथे वंचित बहुजन आघाडी व समविचारी पक्ष संघटनांच्या वतीने आक्रमक आंदोलन छेडण्याचा येईल असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांनी दिला आहे या निवेदनावर , शिवसेना(उध्दव बाळासाहेब ठाकरे) जालना तालुकाध्यक्ष गणेश दराडे, प्रल्हाद पालवे दिलीप मगर, मुकुंद काळे, गौतम वाघमारे, विठ्ठल खाडे, दत्ता खाडे, शहाजी खाडे, शत्रुघ्न कोळी, बबन खाडे, रूस्तुम तुरेराव, रोशन सदावर्ते करण काळे दिपक काकडे,नंदु बच्छीरे,दिपक उघडे, संतोष मगर, अर्जुन घुगे, भिवाजी मगर,योगेश उघडे, विश्वनाथ मगर, भिमराव घुगे, प्रकाश प्रधान केरुबा घुगे सुनील उघडे संम्यक डोके, संकेत उघडे बाबासाहेब उघडे यांच्या सह स्वाक्षऱ्या आहेत.



**जालना जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने वाहन तपासणी चे विशेष मोहीम घेण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल पोलीस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी सदर बाजार चे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या सह शहर वाहतूक पोलीस कर्मचारी या मोहीम मध्ये वाहनांवर कारवाई करताना दिसत आहे. (छाया - अनिल व्यवहारे)**

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत- २०२४-२५ या वर्षात मंजूर झालेल्या जालना जिल्ह्यातील- ५१८० लाभार्थ्यांचे खात्यामध्ये निधी वितरित करा

## इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांना निवेदन सादर

**जालना । प्रतिनिधी -** विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रभागातील घटकासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत शासन निर्णय संदर्भ क्रमांक-१ व शासन शुद्धिपत्रक संदर्भ क्रमांक-२ ते ४ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना जिल्हास्तरीय समिती जालना यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/०१/२०२४ व दि.२९/०१/२०२४ आणखी दि.१४/०२/२०२४ रोजी बैठक पार पडली होती. सदर बैठकीत जिल्हास्तरीय समितीने घेतलेल्या निर्णयास अनुसरून दि.१६/०२/२०२४ रोजीच्या आदेशाने ज्यांना जिल्ह्यातील वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर प्रस्तावास संदर्भ क्रमांक-७ येथील पत्रान्वय शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत सन-२०२४-२५ या वर्षाकरिता जालना जिल्ह्यातील-५१८० वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावास (परिशिष्ट-अ-प्रमाणे) कार्योत्तर मान्यता देण्यात आली होती.आणि सदरहून लाभार्थ्या करिता प्रति लाभार्थी रु.१.२० लक्ष प्रमाणे र.६२,१६,००,०००/-(बासष्ट कोटी सोळा लक्ष रुपये) व ४ टक्के प्रशासकीय निधी(प्रति घरकुल रु.४८००/-(चार हजार आठशे रुपये)प्रमाणे रु.२,४८,६४,०००/-(दोन कोटी अठ्ठेचाळीस लक्ष चौसष्ट हजार) असे एकूण रु.६४,६४,६४,०००/- (चौसष्ट कोटी चौसष्ट लक्ष चौसष्ट हजार रुपये) निधी स शासनाची मान्यता देण्यात आली होती. सदरहू निधी पैकी तुर्त रु.२,५०,००,(दोन कोटी,पन्नास लक्ष रुपये इतका निधीस वितरित करण्याचे आदेश देण्यात आले होते.तसे शासन निर्णयांमध्ये नमुद करण्यात आले होते. परंतु अद्याप निधी मंजूर होऊन लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा झालेलं नाही.



तसेच सदर शासन निर्णय दि.२६ सप्टेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. परंतु अद्याप निधी उपलब्ध नसल्याने या लाभार्थी घरकुल बांधकामांपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे शासनाने त्वरित दखल घेऊन निधी उपलब्ध करावे. अशी मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त आघाडीचे जालना जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम राठोड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# हस्तपोखरी येथील बायोफ्लॉक प्रकल्पाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**जालना । प्रतिनिधी -** प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना () अंतर्गत हस्तपोखरी ता. जालना येथे जालना जिल्हात राबविण्यात येत असलेल्या पहिल्या पुर्ण झालेल्या बायोफ्लॉक मत्स्यपालन प्रकल्पास जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी भेट देऊन सविस्तर पाहणी केली.व प्रकल्प राबविणाऱ्या श्रीमती प्यारण घुले या लाभार्थींशी चर्चा केली. ग्रामीण भागातील युवक-शेतकऱ्यांना मत्स्यव्यवसायातून शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प उभारण्यात आला आहे.याठिकाणी पगॅसीयस व रोहू या जातींच्या माशळी संवर्धन व मासळी वाढ केली जात आहे.

भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकल्पात उभारण्यात आलेल्या ५० टाक्यांच्या (बायोफ्लॉक टँक) माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आधुनिक मत्स्यपालन पद्धतीची माहिती घेतली. कमी जागेत आणि कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी ही पद्धत ग्रामीण भागासाठी फायदेशीर ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती, उत्पादन क्षमता, बाजारपेठ उपलब्धता व लाभार्थ्यांची आर्थिक प्रगती याबाबत सविस्तर चर्चा केली.

या प्रकल्पाची किंमत ५० लाख रुपये असून प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेतून ३० लाख रुपये अनुदान आहे. बायोफ्लॉक तंत्रज्ञानामुळे मत्स्यपालन अधिक शास्त्रीय पद्धतीने करता येत असून, पाण्याचा पुनर्वापर, कमी खर्चात जास्त उत्पादन आणि रोगनियंत्रण या बाबींमध्येही यश मिळत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी मत्स्यव्यवसायिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व आवश्यक त्या तांत्रिक व प्रशासकीय मदतीचे आश्वासन दिले. ग्रामीण भागातील युवकांनी अशा नाविन्यपूर्ण प्रकल्पांचा लाभ घेऊन स्वावलंबी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी,सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय अ. रा. सुरवसे,तहसीलदार विजय चव्हाण, गटविकास अधिकारी श्रीमती ज्योती कवडदेवी, जमील शेख, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, जालना, डॉ रश्मी आंबुलकर, सहाय्यक मत्स्यव्यवसाय अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक मत्स्यव्यवसायिक उपस्थित होते. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यात विविध ठिकाणी अशा प्रकल्पांची उभारणी करण्यात येत असून, मत्स्य उत्पादन वाढवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



# जालन्यात सामूहिक भगवद्गीता प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात

## ६ ते १५ वर्ष वयोगटातील शंभर विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम, जालना यांच्यावतीने दि. २२ फेब्रुवारी रोजी शहरात सामूहिक भगवद्गीता प्रश्न-उत्तर स्पर्धेचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून चिमुकल्यांमध्ये भारतीय संस्कृती आणि गीतेचे संस्कार रुजवण्याचा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

या स्पर्धेत ६ वर्षांपासून ते १५ वर्षांपर्यंतच्या तब्बल १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. भगवद्गीतेवर आधारित विचारलेल्या प्रश्नांना विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने उत्तरे दिली. स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामतर्फे प्रमाणपत्राचे तर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस प्रदान करून गौरवण्यात आले.

कार्यक्रमाला महंत स्वामी सच्चिदानंदजी यांची वंदनीय उपस्थिती लाभली. प्रमुख मार्गदर्शक राजीव जहागीरदार, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवरतन मुंदडा, प्रांत सदस्य नितीन कोळेश्वर, जिल्हा मंत्री अतुल उपाध्याय, मंदिर अर्चक पुरोहित आयामचे सहसंपर्कप्रमुख शैलेश ठक्कर आणि चेतन वर्मा यांनी या संपूर्ण उपक्रमाची रूपरेखा आणि नियोजन अत्यंत नेटकेपणाने तयार केले होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्जुन डहाळे, बालाजी नलमेल, गौरव देशमाने, केतन रुणवाल, ऋषिकेश करपे, व्यंकटेश भगत, अक्षय राजपूत,यश सरकटे, आखाडा प्रमुख नागेश क्षीरसागर तसेच विविध आखाडा प्रमुखांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे पालकांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले. भविष्यातही असे संस्कारक्षम कार्यक्रम राबवणार असल्याचे आयोजकांनी याप्रसंगी सांगितले.



# मारवाडी समाजाचे आराध्य दैवत श्री शितला माता मंदिर परिसरात स्वच्छता करावी- विकासकुमार बागडी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील काद्राबाद भागातील दर्गा वेस जवळील निमाजमकालीन प्राचीन मारवाडी समाजाचे आराध्य दैवत श्री शितला माता मंदिर परिसरात साफसफाई करून, पथदिवे बसवावेत, अशी मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांनी केली आहे.

याबाबत महापौर वंदना मगरे जालना शहर महानगरपलिका यांना दिलेल्या निवेदनात श्री शितलादेवी मंदिर परिसरात व रस्त्याची स्वच्छता करावी, तात्पुरते शौचालय उभारावे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, पथदिवे बसवोत, वाहतुक नियंत्रण व पार्कींग व्यवस्था करावी, कचरा संकलनासाठी विशेष पथक नेमावे, व वैद्यकीय मदत व्यवस्था करावी आदि मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

मारवाडी, अग्रवाल,




माहेश्वरी, ब्राह्मण, जैन, माळी, नाई, जाठ तसेच सकल राजस्थानी बहुभाषिक समाजाचे सुमारे ६० हजार पेक्षा जास्त भाविक-भक्त शितला माता पुजा महोत्सवात सहभाग होत असतात. सदरील पुजा दि. ४ मार्च ते १६ मार्च २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. तरी मनपा प्रशासनाने श्री शितला माता मंदिर परिसरात वरिल सुविधा द्याव्यात अशी मागणी करण्यात आली. तसेच सद्या परिस्थितीच्या बघुन महिला व मुलांनी सोन्या-चांदीचे दागिणे व महाग वस्तु सोबत आणू नये असे आवाहनही विकासकुमार बागडी यांनी केले आहे.

# ऐतिहासिक वारसा असलेल्या बारवांचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी -जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या अंबड शहरातील पुरातन व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पुष्करणी बारव येथे आज जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी बारवांच्या जतन व संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला.

पुष्करणी बारव ही अंबड शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देणारी वास्तू असून, तिचे जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. या बारवेसाठी मंजूर निधीतून बारव परिसराचे सुशोभीकरण, संरक्षक भिंतींची दुरुस्ती, पायऱ्यांची मजबुतीकरण कामे, पाणी साठवण क्षमतेत सुधारणा, तसेच पर्यटकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उभारण्याचा समावेश आहे.

पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना कामाचा दर्जा उच्च प्रतीचा राखण्याच्या सूचना दिल्या. ऐतिहासिक वास्तूंची मूळ रचना अबाधित ठेवूनच संवर्धनाची कामे करण्यात यावीत, तसेच कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच बारवेभोवती असलेले अतिक्रमण तात्काळ काढणेबाबत निर्देश देण्यात आले.यावेळी त्या म्हणाल्या की, ''ऐतिहासिक वारसा ही आपल्या संस्कृतीची ओळख आहे. बारवांसारख्या जलसंपत्तीच्या प्राचीन वास्तू या आपल्या पूर्वजांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.'' नागरिकांनीही अशा वारसा स्थळांची स्वच्छता व संरक्षण यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.



पाहणीवेळी उप विभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी, तहसीलदार विजय चव्हाण, नगराध्यक्ष श्रीमती देवयानी कुलकर्णी, सहायक संचालक पुरातत्त्व विभाग श्रीमती जया वाहणे, स्वच्छता सभापती सचिन खरात, नगर सेवक संदिप खरात, केदार कुलकर्णी, फिरोज शेख, माजी नगराध्यक्ष सुरेश गुढे,मुख्याधिकारी नगर परिषद अंबड मनोज उर्किडे,पुरातत्त्व विभागाचे इंजिनिअर रामचंद्र निपाणे, महावारसा समिती सदस्य रामभाऊ लांडे यांची उपस्थिती होती.पुष्करणी बारव संवर्धन प्रकल्पामुळे अंबड शहराच्या पर्यटन विकासाला चालना मिळणार असून, स्थानिकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# २७ फेब्रुवारीला जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची महत्त्वाची बैठक शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीचे अध्यक्षपद जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल या भूषविणार असून यात ग्राहकांच्या विविध समस्यांवर चर्चा केली जाणार आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी कळविले आहे की, या समितीवर नियुक्त सर्व शासकीय आणि अशासकीय सदस्यांनी बैठकीस वेळेत उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जालना जिल्ह्यातील ज्या सामान्य नागरिकांच्या ग्राहक हिताशी संबंधित काही तक्रारी किंवा समस्या असतील, त्यांनी या बैठकीच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपला लेखी अर्ज सादर करावा. प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसल्यास किंवा आगाऊ तक्रार नोंदवायची असल्यास, प्रशासनाने डिजिटल सुविधेचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. नागरिक जालना जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ग्राहक तक्रार पोर्टल (फॉर्म) माध्यमातून आपल्या समस्या नोंदवू शकतात. जास्तीत जास्त ग्राहकांनी आपल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# आरोग्य क्षेत्रात 'कलावती'ची मोठी झेप

## जालन्यात नवीन एमआरआय मशीनचे उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथे अत्याधुनिक एम.आर. आय. मशीनचे उद्घाटन पद्मश्री पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. हिम्मतराव बावस्कर यांच्या हस्ते दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले. या आधुनिक यंत्रणेच्या सुरूवातीमुळे जालना जिल्ह्यातील रुग्णांना आता अत्याधुनिक व अचूक निदान सुविधा स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार आहे.

या कार्यक्रमास हॉस्पिटलचे संचालक डॉ. कृष्णा कोरडे, डॉ. मच्छिंद्र तुकाराम असोरे, एमआरआय टेक्निशियन, हॉस्पिटलमधील इतर डॉक्टर व कर्मचारी तसेच विजय पाटील जगताप यांची उपस्थिती होती.

एम.आर.आय. ही वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत प्रगत व सुरक्षित तपासणी पद्धत आहे. या तंत्रज्ञानाद्वारे शरीरातील अंतर्गत अवयवांचे सूक्ष्म व स्पष्ट चित्र मिळते, ज्यामुळे अनेक गंभीर आजारांचे निदान अचूकपणे करता येते.

**एम.आर.आय. तपासणीचे प्रमुख फायदे**

मेंदू, मज्जासंस्था, मणका, सांधे आणि स्नायूंची अचूक तपासणी, ट्यूमर, रक्तस्राव, स्ट्रोक, डिस्क समस्या यांचे लवकर निदान, शस्त्रक्रियेपूर्व नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त, एक्स-रे किंवा सीटी स्कॅनप्रमाणे किरणोत्सर्ग नसल्यामुळे सुरक्षित

सूक्ष्म बदलही स्पष्ट दिसतात, त्यामुळे उपचार अधिक प्रभावी होतात

या अद्ययावत मशीनमुळे जालना व परिसरातील रुग्णांना आता मोठ्या शहरात जाण्याची गरज कमी होणार आहे. वेळ, खर्च आणि उपचारातील विलंब टाळून जलद व अचूक निदान स्थानिक पातळीवरच उपलब्ध होणार आहे. आपत्कालीन परिस्थितीतही त्वरित तपासणी करणे शक्य होणार असल्याने रुग्णसेवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान ग्रामीण व निमशहरी भागात उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे. या सुविधेमुळे परिसरातील नागरिकांना उच्च दर्जाची आरोग्यसेवा मिळेल आणि गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन उपचार अधिक परिणामकारक ठरतील.

एकूणच, कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये सुरू झालेली एम.आर.आय. सेवा ही जालना जिल्ह्यासाठी आरोग्य क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण आणि स्वागतार्ह पाऊल मानले जात आहे.

# पीएम विश्वकर्मा विक्री व प्रदर्शनाला जिल्हाधिकारी यांनी दिली भेट

**जालना । प्रतिनिधी -** भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देऊन पाहणी केली.

जुना जालना भागातील मस्तगढ येथील शितल गार्डन येथे दि.२५ ते २७ फेब्रुवारी २०२६ कालावधीत हे प्रदर्शन सुरू असून यात वैविध्यपूर्ण स्टॉल उभारण्यात आले आहेत. यावेळी खादी व ग्रामोद्योग अधिकारी बी. के. वाघमारे, एमएसएमई विकास कार्यालयाचे सहायक संचालक राहुलकुमार मिश्रा यांच्यासह उद्योग संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



## वाघलखेडा आणि सारंगपूर च्या शेतकऱ्यांचा पुढाकार

# आकार संस्थेच्या आर्थिक मदतीने लोकसहभागातून पहिल्या बांधाऱ्याचे बांधकामाला सुरुवात

**जालना । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यात वाघलखेडा आणि सारंगपूर च्या शेतकऱ्यांच्या पुढाकाराने आकार संस्थेच्या आर्थिक मदतीने लोकसहभागातून आज बुधवार दि. २५/०२/२०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता पहिल्या बांधाऱ्याचे बांधकामाला शेतकरी, ग्रामस्थ, मा जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये जे सी बी चे पूजन करुन नारळ फोडून खोदकामला सुरुवात करण्यात आली.

जिल्हाधिकारी मॅडमनी सर्व शेतकऱ्यांचे कौतुक करून उपस्थित सर्वांना शासकीय योजनेच्या माहिती देऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणीच्या शेत रस्ता, कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊन ही कोल्हापुरी बंधाऱ्यांना दरवाजा नसल्यामुळे पाणी साचत नसल्याने संबंधित विभागाची चौकशी लावण्याचे उपस्थित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले.

तसेच मा तहसीलदार श्री विजय चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत लोक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करिता ग्राम स्तरावर सर्व प्रलंबित कामे करून घेण्यासाठी १४ मार्च पासून सुरु होणाऱ्या जनजागृती मोहीम संदर्भात सखोल माहिती दिली.

वाघलखेडा येथे गट नंबर ०८ मधील ७५ फूट रुंदी असलेल्या नाल्याचे शेतकऱ्यांच्या मदतीने दगड आणि सिमेंट चा बंधारा बांधकामासाठी जे. सी. बी. द्वारे खोदकाम करिता अंबड चे मा. उपविभागीय अधिकारी श्री उमाकांत पारधी, मा. तहसीलदार श्री विजय चव्हाण,

मा. गटविकास अधिकारी श्रीमती ज्योती कवडादेवी, मा. तालुका कृषी अधिकारी श्री बाळासाहेब गंडे, मा. मंडळ अधिकारी श्री सुनील कारमपुरी, मा. तलाठी श्रीमती शारदा घाटे, मा. ग्राम विकास अधिकारी श्री येमूल, श्री नरेंद्र जोगड,

शेतकरी श्री अंकुश जाधव, श्री शाम काकडे, श्री सुनील काकडे, श्री राजू डोके, श्री नामदेव राऊत, श्री उद्धव काकडे, श्री दिनेश काकडे, श्री गजानन घुगे, श्री गणेश सानप, श्री श्री संतोष पिलांगे, श्री नरेंद्र जोगड, श्री भगवान रेगुडे, श्री रवी मसलकर यांची उपस्थिती होती. यासाठी गेल्या आठ महिन्यापासून शेतकरी श्री सुरेश घुगे यांनी अथक परिश्रम घेतले.

आर्थिक सहकार्य करणारी आकार संस्था, राजस्थान चे श्री कृष्णा करोडिया, जलक्रांती च्या वतीने स्थानिक समन्वयक देवा चित्राल यांनी कामकाज पहिले.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.